(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६ अ करीता )

क्र.पोमसं/३/११/६/पदो.मु.गु.वा.अधि./रागुवि/१०१/२०२

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय**

शहीद भगतसिंह मार्ग, कुलाबा, मुंबई-०१.

दिनांक :- १५/०९/२०२२

**वाचा:** १ शासन निर्णय, समान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९

२. शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग,क्र. बीबीसी-२०१८/प्र.क्र.३६६/ १६-ब, दिनांक ०७/०५/२०२१

३. महसुली विभाग वाटप नियम-२०२१, दिनांक १४/०७/२०२१,

**-:आ दे श :-**

उपरोक्त संदर्भ क्र.२ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील राज्य गुप्तवार्ता विभागातील सहायक आयुक्तांची सर्व रिक्त पदे दिनांक २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या मुख्य गुप्तवार्ता अधिकारी यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार सहायक आयुक्त पदावर पदोन्नतीद्वारे भरण्यात येत आहेत. संदर्भ क्र.२ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने सहायक आयुक्त पदावर पदोन्नती देण्यासाठी "मुख्य गुप्तबार्ता अधिकारी" यांची नियमित निवडसूची (भाग-१) सन २०२१-२२ तयार केली आहे.

२. मुख्य गुप्तवार्ता अधिकारी ते सहायक आयुक्त पदावर पदोन्नतीसाठी सन २०२१-२२ च्या निवडसुची करीता दिनांक ०९/०६/२०२२ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत सहायक आयुक्त पदावर पदोन्नतीसाठी **पात्र** ठरलेल्या मुख्य गुप्तवार्ता अधिकाऱ्यांपैकी ०५ मुख्य गुप्तवार्ता अधिकारी यांना सहायक आयुक्त पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दिनांक १४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल संवर्ग वाटप करण्यात आलेले आहेत.

३. अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.रापोसे-१३२२/प्र.क्र.११५/पोल-१अ, दिनांक ७/०९/२०२२ अन्वये सहायक आयुक्त पदावर पदस्थापना देण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ हे सक्षम अधिकारी असल्याचे कळविले आहे. त्यास अनुसरुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम,१९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन, खालील नमूद ०५ मुख्य गुप्तवार्ता अधिकारी यांनी, कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासुन **"सहायक आयुक्त "**पदावर **तात्पुरत्या स्वरुपात** पदोन्नतीवर त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकांत पदस्थापना करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ यांनी मान्यता दिली आहे :-

| **अ.क्र.** | **मुख्य गुप्तवार्ता अधिकारी यांचे नांव** | **रा.गु.वि. येथील सध्याची नेमणूक** | **वाटप केलेला महसुल संवर्ग** | **पदोन्नतीवर पदस्थापनेचे ठिकाण** |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| १. | हर्षवर्धन गंगाधर कवितके | अहमदनगर केंद्र | औरंगाबाद | अपर उप आयुक्त कार्यालय, रा.गु.वि., नांदेड घटक |
| २. | स्वानंद गजानन राजपूत | नवी मुंबई केंद्र | कोकण - २ | रा.गु.वि., मुख्यालय, मुंबई |
| ३. | चिन्मय वसंत देसाई | रत्नागिरी केंद्र | नागपूर | रा.गु.वि., गडचिरोली केंद्र |
| ४. | नितीन प्रभाकरराव खोडके | अकोला केंद्र | नागपूर | रा.गु.वि., अहेरी केंद्र |
| ५. | महेश मोहन साठे | पुणे ग्रामीण | औरंगाबाद | रा.गु.वि., परभणी केंद्र |

२...

Scanned with OKEN Scanner

४.	वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन असलेल्या मुख्य गुप्तवार्ता अधिकाऱ्यांविरुध्द आता गुन्हा दाखल झाला असेल / निलंबनाची कारवाई केली असेल /विभागीय चौकशी प्रलंबित असेल / शिक्षा प्रलंबित असेल / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल, किंवा ते एखादी शिक्षा भोगत असतील तर आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग यांनी त्यांना पदोन्नती न देता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणांची सविस्तर माहिती या कार्यालयास ई-मेलव्दारे / फॅक्सव्दारे तात्काळ पाठवावी, व पुढील आदेशाची वाट पहावी.

५.	सदरील आदेश मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अंतिम आदेशांच्या अधिन राहुन व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भाधिन दिनांक ७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहुन निर्गमित करण्यात येत आहेत.

६. जर एखाद्या घटकामध्ये निवडणूकीची प्रक्रिया सुरु झाल्यास किंवा त्या अनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटक प्रमुखांनी त्याबाबत संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजीपूर्वक दक्षता घेऊन पुढील कार्यवाही करावी.

७.	सदर आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH या शिर्षाखाली देखील उपलब्ध होतील.

८.	पदोन्नत झालेल्या सर्व मुख्य गुप्तवार्ता अधिकाऱ्यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.

**रजनिश सेठ**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा.,मुंबई.

**प्रत सविनय सादर :-**

अपर मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, गृह विभाग,
२ रा मजला, मंत्रालय, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मुंबई -४०००३२
( **लक्षवेध :-** श्री.स्वप्नील बोरसे, अवर सचिव, गृहविभाग, पोल-१अ)

(२.	त्यांचे पत्र क्र.रापोसे-१३२२/प्र.क्र.११५/पोल-१अ, दिनांक ७/०९/२०२२ ला अनुसरुन)

**प्रत आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी :-**

कार्यालय अधिक्षक, का.क्र. २, १४अ.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष,पोलीस महासंचालक यांचे कार्यालय

२.	पोलीस उप अधिक्षक यांनी कृपया सदरचे आदेश http://www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर FLASH करावेत.

**( संजीव कुमार सिंघल )** ७/९/२०२२
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचे करिता.

Scanned with OKEN Scanner